| महाराष्ट्र शासन<br>आरोग्य विभाग<br>जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ |
|---|


| कार्यालय<br>वयक्तिक<br>Email | ०२५१-२७०९४३२<br>०२५१-२७०८७३०<br>ulhasnagarcs@gmail.com | जा.क्र.मरुउ/भांडार/तातडीची बाब /ABC Fire Extinguisher/ रिफिलिग/ दर पत्रक सादर/ 1863 /२६<br>दिनांक २५/०२/२०२६ |
|---|---|---|


# जाहीर नोटीस (दरपत्रके आमंत्रण पत्र)

सुचित करण्यात येते की,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ या रुग्णालयाकडील सन-२०२६-२०२७ या कालावधीमध्ये या रुग्णालयाकडील ०६ किलो क्षमतेची ३८ व ०४ किलो क्षमतेची ०४ ABC प्रकारातील एकुण ४२ Fire Extinguisher रिफिलिंग करण्यासाठी दरपत्रके मागविण्याचे निश्चित केलले आहे. तरी इच्छुक Fire Extinguisher रिफिलिंग व्यापारी यांनी बंद लिफाफामध्ये खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत (खालील अ.क्र.१६ नुसार) जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी. स्थानीक पुरवठाधारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

==========================================

## दरपत्रके सादर करणा-यां रिफिलिंगधारकांसाठी सर्वसाधरण अटी शर्ती

१) इच्छुक रिफिलिंग धारकांनी बाबनिहायं (Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत.यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे.त्याचे नांव असावे.

२) एका रिफिल धारक यांना बाबनिहाय फक्त ०१ दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये.असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबधाचा संघर्ष म्हणून समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील.उदा.जर दोन रिफिलिंग धारक कंपन्या एकाच बाबीसाठी/प्रकल्पासाठी/निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती जी "कंपनी एक्स"चा मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती"कंपनी वाय" ची मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक नसावी.

३) रिफिलिंग करण्यासाठी अधिकृत रिफिलिंगधारक, ठोक व्यापारी यांना दरपत्रक सादर करता येतील.

४) दरपत्रकात रिफिलिंग करण्यात येणा-या बाबी बद्दलची सविस्तर माहीती जसे वायुचा प्रकार नमुद करणे आवश्यक आहे.निर्माणकर्तो(Manufaturer)यांचे अधिकृत विक्रेता/ठोक व्यापारी असणेबाबतचे पत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड छायांकित प्रत सांक्षांकित करुन जोडावी.

६) संस्था/दुकान,साहित्य पुरवठा/विक्रि विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडवा.

७) दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता/ठिकाण- जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

८) व्यापारी लिफाप्यामध्ये यादीमधील Fire Extinguisher वजन क्षमतेनुसार प्रती Fire Extinguisher व दर GST व इतर करांसह नमुद करावेत.

९) विहीत कालावधीत पुरवठा न झाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

१०) विहीत नमुन्यातील वस्तु व सेवा कर (GST Number) सहीत देयके स्विकारण्यात येतील. दर हे GST व इतर सर्व करांसह व उचल-ठेव हमाली पोहच खर्चासहीत असावे. Fire Extinguisher रिफिलिंग करुन मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ येथे पोहच करावी लागेल.

११) मंजुर न्युनतम दरांवर पुरवठाधारकास पुरवठा करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने खरेदी करावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दरधारकाकडुन वसुल केली जाईल.

१२) रिफिलिंग चे दर हे अधिकतम विक्री किमंतीपेक्षा (MRP) जास्त नसावे.

१३) वस्तू व सेवांच्या दराबाबत शासकिय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना,शासन निर्णय, परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१४)मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर-३ या रुग्णालयाकडील रिफिलिंग करण्यात येणा-या Fire Extinguisher यात मधील वायुचा दर्जा हा सर्वोत्तम असावा. सदरील वायु हा आय.एस.आय मार्क दर्जाचा असावा.

१५)इच्छुक रिफिलिंग धारकास कोणत्याही शासकीय विभागाने रिफिलिंग प्रक्रियेसाठी काळया यादीत टाकले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र लिहुन देणे बंधनकारक आहे.

१६)दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकपासून सात दिवस दिनांक 06/3/२०२६ संध्या.५.०० वाजेपर्यंत असेल (कार्यालयीन सुट्टी वगळुन) उशिरा प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१७)दरपत्रके उघडण्याची तारीख 10/3/२०२६ संध्या ०५.३० वा. किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१८)कोणतेही लेखी किंवा तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवा अंशतःखरेदी प्रक्रिया रद्द् करण्याचे सर्व अधिकार मा.जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ यांनी राखून ठेवलेले आहेत.

१९)या रुग्णालयाकडुन मागणी केलेल्या वस्तुंचेच व्यापारी लिफाफात दर GST व इतर करांसह नमुद करावे.

२०)मान्य न्युनतम दर एक वर्ष (३६५ दिवस) वैध राहतील.

(डॉ.मनोहर बनसोडे)
जिल्हा शल्यचिकीत्सक
मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

प्रत- या रुग्णालयाच्या नोटीस बोर्डावर डकवुन प्रसिध्दीसाठी .

NHM IT cell या वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी

# व्यापारी लिफाफा

## रिफिलिंग करण्यासाठी Fire Extinguisher च्या क्षमतानिहाय यादी

| अ. क्र | साहित्याचे नाव | प्रकार व क्षमता | रिफिलिंगसाठी प्रस्तावीत असलेले एकुण नग | रिफिलिंगसाठी प्रति ०१ नग GST व ईतर करांसह दर |
|---|---|---|---|---|
| १ | Fire Extinguisher | ABC ०६ किलो | ३७ | |
| २ | | ABC ०४ किलो | ०४ | |

स्वाक्षरी

रिफिलिंग धारकाचे संपुर्ण नाव-----------------------------

रिफिलिंग करणा-या संस्थेचे नाव---------------------------

संपुर्ण पत्ता --------------------